## नियमित दिवाणी मुकदमा क्र. ३८/२०१८

## नि. ५६ वरील आदेश

प्रस्तुतचा अर्जद्वारे वादीने असे कथन केले आहे की, प्रतिवादी क्र. ३ ही दि. ०८/०२/२०१९ रोजी गाव मौजे हेवाळे, ता. दोडामार्ग येथे मयत झाली आहे व तिला प्रतिवादी क्र. ४ ते ८ ही मुले आहेत. ती यापूर्वीच दाव्यात प्रतिवाद क्र. ४ ते ८ म्हणून सामील आहेत. सबब, प्रतिवादी क्र. ३ हिच्या नावासमोर मयत असे दाव्यात नमूद करुन तशी दुरुस्ती दाव्यात करण्यासाठी वादींनी विनंती केली आहे. सदर अर्जावर प्रतिवादींनी म्हणणे दिले की, म्हणणे दिले की, न्यायहितार्थ आवश्यक ते निर्णय घेण्यात यावा. वादीने अर्जाच्या पृष्टयर्थ प्रतिवादी क्र. ३ हिचा मयत दाखला नि. ५८ जोडलेला आहे, त्यावरुन प्रतिवादी क्र. ३ ही दि. ०८/०२/२०१९ रोजी मयत झाल्याचे निदर्शनास येते. वादीने प्रस्तुतचा अर्ज दि. ३०/०३/२०१९ रोजी दाखल केलेला आहे. त्यामुळे तो मुदतीचा कायदा कलम १२० प्रमाणे मुदतीत आहे. सदरचा दावा हक्कप्रस्थापना व कायमच्या ताकीदीसाठी आहे. त्यामुळे प्रतिवादी क्र. ३ जरी मयत असली तरी तिच्या वारसांचे हक्क दाव्यात अंर्तभूत झालेले आहेत व ते या कामी आवश्यक पक्षकार आहेत. सबब, अर्ज मंजूर करण्यात येतो. वादीने दाव्यात दुरुस्ती करावी व दुरुस्त दाव्याची प्रत पटलावर योग्य त्या मुदतीत दाखल करावी.

सही/—
(एस.एच.पन्हाळे)
दिनांक. ३०/०३/२०१९ — दिवाणी न्यायाधीश (क.स्तर),दोडामार्ग.